I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** सातारा शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0924 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/11/2025 17:08 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 21/04/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 21/04/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:46 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:06 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 08/11/2025 **Time (वेळ):** 16:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 043 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 08/11/2025 17:08 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 0.5 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम, कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुप्रिया सुभाष गावडे

(b) **Husband's Name (चे नाव ):** सुभाष गावडे

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा , सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा , सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7758082005

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | जमीर शेख | | | 1. Town/Village (शहर / गाव): सातारा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सातारा शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 08/11/2025
मी सुप्रिया सुभाष गावडे वय 33 वर्षे, व्यवसाय पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा मोनं - 7758082005
समक्ष सातारा शहर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की, मी वरीलप्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा येथे दिनांक 20/08/2025 रोजीपासुन नेमणुकीस आहे.
दिनांक 21/04/2025 रोजी पोलीस निरीक्षक सचिन अंकुश राऊत, तत्कालिन नेमणुक लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग सातारा हे अॅन्टी करप्शन ब्यूरो, सातारा कार्यालयात हजर असताना, पोलीस उप अधीक्षक राजेश वाघमारे यांनी तक्रारदार शकील मकबुल मणेर वय 45 वर्षे, व्यवसाय - मजुरी रा. लोणंद ता.खंडाळा जि.सातारा यांची ओळख करून देवून, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन, त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करून घेवुन पुढील कारवाई करणेबाबतचा आदेश दिला, तसेच पोहवा/546 ताटे, पोकॉ/443 देशमुख हे मदत कामी दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत यांनी लागलीच उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सातारा यांचे कार्यालयातून लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच बोलावून घेतले. त्यानुसार दि.21/04/2025 रोजी 14.00 वाजता दोन पंच एसीबी कार्यालय, सातारा येथे हजर झाले सदरवेळी 1.जितेंद्र गणपत बगाड, वरिष्ठ सहायक, बांधकाम विभाग उत्तर, जिल्हा परिषद सातारा 2. वैभव जगन्नाथ बोराटे, वरिष्ठ सहायक, बांधकाम विभाग उत्तर, जिल्हा परिषद सातारा यांची व तक्रारदार मणेर यांची ऐकमेकांना ओळख करून दिली. तसेच सापळा पथक यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी पंच साक्षीदार यांना तक्रारदार शकील मणेर यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून जितेंद्र गणपत बगाड, पंच क्र.2 म्हणून वैभव जगन्नाथ बोराटे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांना त्यांची तक्रारी बाबत विचारणा करता प्रथम त्यांनी तोंडी तक्रार कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी बांधकाम कामगार मजुर म्हणुन काम करत आहे. बांधकाम कामगार महासंघ नोंदणी क्रमांक पी.एन. नं. 3930 संलग्न भारतीय मजदुर संघ - महाराष्ट्र प्रदेश (सातारा जिल्हा) या संस्थेकडे बांधकाम कामगार रजिष्टर नाव नोंदणी केली आहे. माझी मुलगी फातिमा ही बी फार्मसी च्या पहील्या वर्षाचे शिक्षण नवसहयाद्री इस्टीटुट ऑफ फार्मसी नायगाव (नसरापुर ) ता.भोर जि.पुणे येथे घेत आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडुन बांधकाम कामगार मजुर यांचे मुलांचे पदवीचे शिक्षणासाठी वीस हजार रुपये लाभ मिळतो. माझ्या मुलीच्या शिक्षणासाठी शासनाकडुन देण्यात येणार लाभ मिळावा म्हणुन मी माझ्या मुलीची शैक्षणिक कागदपत्रे कार्यालयातील जमीर शेख यांचेकडे दिली होती. त्यांनी माझ्या मुलीची कागदपत्रे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे ऑनलाईन साईटवर भरली व त्यानंतर मला दिनांक 17/02/2025 रोजी मुळ कागदपत्रांसह तपासणीकरीता खंडाळा ता.खंडाळा येथील कामगार सुविधा केंद्रात उपस्थित राहणेबाबतचे पत्र दिले. त्यानुसार मी माझ्या मुलीसह दिनांक 20/02/2025 रोजी खंडाळा येथील कामगार सुविधा केंद्रात हजर राहीलो त्यावेळी केंद्रातील कर्मचाऱ्यांनी कागदपत्रांची पाहणी करुन केली व कागदपत्र योग्य असलेबाबत लिहुन दिले व शैक्षणिक लाभाचा अर्ज मंजुर झालेबाबतचा मेसेज मोबाईल वर आलेनंतर 15 ते 20 दिवसात पैसे मिळतील असे मला सांगीतले. दिनांक 21/04/2025 रोजी सकाळी 11.00 वा सातारा कार्यालयात जावुन जमीर शेख यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी मला सांगीतले की तुमचे पैसे मंजुर होवुन तुम्हाला मिळतील पण त्यासाठी तुम्हाला मला वीस हजार रुपये अनुदानाचे 15 टक्के प्रमाणे 3000/- रुपये द्यावे लागतील त्यावेळी त्यांना हे पैसे फि चे आहेत का असे विचारले असता त्यांनी हे पैसे फि चे पैसे नाहीत तुम्ही पैसे दिले नाहीत

तर तुमचे अनुदानाचे पैसे मंजुर होणार नाहीत असे सांगीतले. जमीर शेख हे माझ्याकडे मागत असलेले तीन हजार रुपये हे शासकीय फी नसुन लाच मागत असल्याची माझी खात्री झाली आहे. परंतु मला जमीर शेख यांना लाच रक्कम देण्याची अजिबात इच्छा नाही. तरी आपले विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. वैगेरे मजकूरची दिनांक 21/04/2025 रोजी लाप्रवि, कार्यालय सातारा येथे हस्ताक्षरातील लेखी तक्रारी अर्ज हजर केला होता. तो अर्ज पोलीस निरीक्षक सचिन राऊत यांनी पंचास दाखवला सदर अर्जाचे अवलोकन करून त्यावर पोनि राऊत व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर पो.नि.राऊत यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर लागलीच पो.नि. राऊत यांनी पडताळणी कारवाईचे नियोजन केले. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी पंचासमक्ष तक्रारदार मणेर यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व त्यांचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवुन त्यात एमएमकार्डस कंपनीचे नवीन मेमरीकार्ड पंचासमक्ष घालुन व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच नंबर 1 बगाड यांचे निवेदन घेतले त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील असले बनियानचे आत मध्ये पिनचे सहाय्याने लावुन तक्रारदार मणेर व पंच नं.1 असे तक्रारदार यांच्या हिरो होंडा मोटारसायकल क्रमांक एम.एच. 11 बी.टी. 9639 वरुन लोकसेवक जमीर शेख यांची सहा.कामगार आयुक्त कार्यालय, सातारा येथे भेट घेण्याकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयातुन 15.46 वा.चे सुमारास रवाना केले. ते 16.06 वा परत आले. त्यानंतर पोनि राऊत यांनी पंच नं.1 बगाड यांना समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता पंच नं.1 यांनी सांगितले की, मी तक्रारदार यांचे सोबत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ येथे गेलो असता तक्रारदार एका इसमास शेख साहेब... शेख साहेब... ओ शेख साहेब... शेखसाहेब नमस्ते..असे म्हणाले त्यावेळी मला ती व्यक्ती क्लार्क,जमीर शेख असल्याचे समजले. तक्रारदार यांनी क्लार्क,जमीर शेख यांचेशी संभाषण सुरू केले. तक्रारदार शेख साहेबांना 'नही ना ओ देखो ना, हमारी छोरी का, शिष्यवृत्ती का, शैक्षणिक का' असे म्हणाले तेव्हा शेख साहेबांनी तक्रारदार यांना त्यांचे आधारकार्ड मागीतले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे आधारकार्ड काढुन शेख साहेबांना दिले. त्यावेळी शेख साहेबांनी त्यांचे समोरील संगणकावर पाहुन तक्रारदार यांचे पैसे अजुन मंजुर झाले नसल्याचे सांगीतले. त्यानंतर शेख साहेब हे त्यांचे आसनावरुन उठुन बाहेर आले व कार्यायातील स्वच्छतागृहाकडे गेले तेव्हा मी व तक्रारदार त्यांचे मागे जावुन स्वच्छतागृहाचे बाहेर उभे राहीलो. तेव्हा शेख साहेब हे स्वच्छतागृहातुन बाहेर येवुन तक्रारदार यांचेशी पुन्हा बोलु लागले. तेव्हा जमीर शेख हे तक्रारदार यांना 'बात हुई मेरी उनके साथ' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना 'हु..' म्हणाले. तेव्हा जमीर शेख यांनी तक्रारदार यांना 'तुम तुम्हारा बोला है, फी का है तुम्हारा.' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना हु.. म्हणाले. तेव्हा जमीर शेख यांनी तक्रारदार यांना 'शंभर टक्के बनवुन देईल काम होईल' असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक शेख यांना 'किसको देणे पडते ?' असे विचारले तेव्हा जमीर शेख यांनी तक्रारदार यांना 'ओ मेरे को देणे का... मै करके लेने वाला हु.' असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी जमीर शेख यांना 'कित्ते देणे के ?' असे विचारले असता जमीर शेख यांनी 'बीस का है ना तुम्हारा' असे म्हणाले व त्यांनी त्यांचे हाताची बोटे मोजुन हिशोब केला व तक्रारदार यांना 'दस के दोन आणि परत ...पंधरा टक्केचे किती होतेय... पाचसो होते

हे ना ?' असे म्हणुन 'अढाई हजार' म्हणाले. त्यावेळी तक्रारदार त्यांना 'अढाई हजार... कम नही होंगे क्या ?' असे म्हणाले असता लोकसेवक जमीर शेख 'नही' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना 'किते दस टक्के चे क्या' असे म्हणाले तेव्हा लोकसेवक शेख 'पंधरा' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना 'पंधरा टक्के के.... अढाई हजार रुपये... अभी लगी देने लगेंगे ? ... अभी लगी देने लगेंगे ?' असे म्हणाले असता लोकसेवक शेख 'नही' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी 'फिर' असे विचारले तेव्हा लोकसेवक शेख तक्रारदार यांना 'मंजुर काम यहाँसे झालेके बाद... तभ आओ हमारे पास...' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार लोकसेवक शेख यांचेकडे पाहुन उजव्या हाताचे अंगठा तर्जनीवर घासुन लाच रक्कमेबाबतचा इशारा केला व म्हणाले की 'मंजुरी के बाद.. अभी ईसका क्या करने का ?' असे विचारले तेव्हा लोकसेवक शेख 'कुछ नही करनेका' असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक शेख यांनी मोबाईल फोन काढला व तक्रारदार यांना 'बीस है ना तुम्हारा ?' असे विचारले व मोबाईल फोनवर हिशोब करुन 'तीन है...सॉरी ... तीन है ... तीन..' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना 'तीन हजार... तीन हजारच है ना ?' असे म्हणले. तेव्हा त्यास जमीर शेख यांनी 'हा' म्हणुन होकार दिला व तक्रारदार यांना 'फिर... मंजुर झाल्याचा मेसेज आया की आणेका मेरे पास' असे म्हणाले व तक्रारदार यांना पैसे जमा झाल्याचा मेसेज आल्यानंतर येण्यास सांगीतले. त्यानंतर मी व तक्रारदार असे कार्यालयाचे बाहेर निघुन आलो. इमारतीचे खाली आलेनंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावर बसुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात दाखल झालो. वगैरे हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि राऊत यांनी तक्रारदार यांना हकिकत विचारता त्यांनी ध्वनिमुद्रीत संभाषणाप्रमाणे व पंच नं.1 यांचे हकिकतीशी मिळतीजुळजी हकिकत सांगितली.

एकंदरीत दिनांक 21/04/2025 रोजी आयोजीत केले पडताळणी कारवाईमध्ये पंच नं 1 बगाड यांचे हकिकतीवरुन तसेच ध्वनिमुद्रीत संभाषणावरुन तक्रारदार शकील मणेर यांची व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा कार्यालयातील लोकसेवक - जमीर शेख, क्लार्क यांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा कार्यालयात समक्ष भेट झाली. त्यावेळी तक्रारदार शकील मणेर व जमीर शेख यांचेत कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा तक्रारदार यांची मुलगी फातिमा हिचे शैक्षणिक अनुदान मंजुरीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा कार्यालयातील जमीर शेख, क्लार्क यांनी यातील तक्रारदार यांचेकडे शैक्षणिक अनुदानाच्या मिळणाऱ्या 20,000/- रुपये रकमेच्या 15 टक्के प्रमाणे 3000/- रुपये लाचेची मागणी केल्याची व लाच रक्कम तक्रारदार यांना त्यांचे मुलीचे शैक्षणिक अनुदानाचे पैसे तक्रारदार यांचे बँक खात्यावर जमा झाल्यानंतर, स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची, पोनि राऊत व दोन्ही पंचांची खात्री झाली. त्यामुळे तक्रारदार यांचे मुलीचे शैक्षणिक अनुदानाची रक्कम खात्यावर जमा झालेनंतर सापळा कारवाई करण्याचे तक्रारदार व पंचांचे सहमतीने पो.नि.राऊत यांनी ठरविले व त्यानुसार तक्रारदार,पंच व सापळा पथकांस सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणी व सापळा पंचनामाबाबतचे स्क्रीप्ट व पंचनामा तयार करुन सर्व कार्यवाही एसीबी कार्यालय, सातारा येथे पूर्ण करण्यात आली आहे.

दिनांक 19/06/2025 रोजी तक्रारदार मणेर हे ला.प्र.वि.सातारा कार्यालयात पो.नि.राऊत यांचेसमक्ष हजर झाले व त्यांनी सांगीतले की, दिनांक 09/06/2025 रोजी तक्रारदार मणेर यांनी बांधकाम कामगार परवाना मिळणेबाबत पुन्हा ऑनलाईन अर्ज भरुन वेबसाईटवर सादर केला. त्यानुसार

दिनांक 16/06/2025 रोजी तक्रारदार यांचा बांधकाम कामगार परवाना नुतनीकरण झाला. बांधकाम मजुर परवाना नुतनीकरण झालेनंतर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा यांचेकडुन लाभ मिळणेसाठी एक रुपयाचे चलन भरावे लागते त्यानंतर योजनेचे लाभ बांधकाम कामगारास मिळतात तक्रारदार

यांचे मुलीचे शैक्षणिक अनुदान मिळणेसाठी लागणारी एक रुपयाची पावती घेण्यासाठी ते दिनांक 19/06/2025 रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा कार्यालयात गेले त्यावेळी त्यांना सदर पावती मिळाली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मुलीच्या शैक्षणिक अनुदानाबाबत चौकशी केली असता कार्यालयातील सुरज चव्हाण यांनी सांगीतले की बांधकाम कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक अनुदानाचे काम पाहणारे जमीर शेख यांचे कावीळ झालेने निधन झाले आहे.

पडताळणी कारवाईचा अहवाल मा.पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.पुणे यांना सादर केलेनंतर गुन्हा दाखल करणेबाबत आम्हास आदेशित केले आहे.

तरी यातील तक्रारदार शकील मकबुल मणेर वय 45 वर्षे, व्यवसाय - मजुरी रा. लोणंद ता.खंडाळा जि.सातारा यांनी दि. 21/04/2025 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार शकील मकबुल मणेर वय 45 वर्षे, व्यवसाय - मजुरी रा. लोणंद ता.खंडाळा जि.सातारा यांची मुलगी फातिमा हिचे शिक्षणाकरीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडुन बांधकाम कामगार मजुर यांचे मुलांचे पदवीचे शिक्षणासाठी वीस हजार रुपये लाभ मंजुर करुन देण्यासाठी लोकसेवक जमीर शेख, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सातारा यांनी पंचासमक्ष 3000/- रु लाचेची मागणी केली म्हणुन त्यांनी बेकायदेशीर, अप्रामाणिकपणे आर्थिक गैरफायदा मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी त्यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखित करण्यात आला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rajendra Bapu Maske (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)**

**Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (किंवा)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Rajendra Bapu Maske

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्‍दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**